
‘आदिवासी भूषण पुरस्कार’ निमित्त

# गौरव विशेषांक

सन २००५-०६

## आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे



धरतीची लेकरं आम्ही... धरतीची रक्षा करु
हातात हात घेऊन... राष्ट्राचा विकास करु!



'आदिवासी भूषण पुरस्कार' निमित्त

# गौरव विशेषांक

## सन २००५-२००६

आदिवासी भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणारे मान्यवर

मा. कॉ. वाहरूजी सोनवणे

मा. ॲड्. मनोहरराव देशमुख

मा. श्री. पांडुरंगबाबा गांगड

दिनांक : रविवार, १८.०६.२००६ वेळ : दुपारी १२.०० वाजता

स्थळ : प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवडगाव, पुणे-४११०३३

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे.

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २.६.२००६

# शुभेच्छा

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे यांच्यावतीने प्रदान करण्यात येणाऱ्या आदिवासी भूषण पुरस्कार निमित्ताने श्री. वाहरू सोनवणे, नंदुरबार, ॲड. मनोहरराव देशमुख, अहमदनगर व श्री. पांडुरंगबाबा गांगड, नाशिक यांच्यावर आदिवासी भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे निमित्ताने कार्यगौरव विशेषांक प्रसिद्ध करीत आहे हे समजून आनंद वाटला.

महाराष्ट्राच्या दुर्गम आणि डोंगराळ भागातील आदिवासींना विकासाची दारे खुली करण्यात तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती व्हावी व त्यांचा मागासलेपणा दूर होऊन त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात एकरूप व्हावे यासाठी आदिवासी भूषण पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी प्रसिद्धीच्या झोतात न रहाता अबोल पद्धतीने प्रशंसनीय कार्य केले आहे. आदिवासी समाजासाठी सातत्याने झटून व शासनाने आखलेल्या योजनांचा आदिवासी समाजाच्या तळागाळापर्यंतच्या लोकांना जास्तीत जास्त लाभ कसा होईल असा प्रयत्न केलेला आहे.

पुढील सर्व वेळ ते आदिवासींच्या उन्नतीकरिता घालवतील अशी माझी अपेक्षा आहे. मी त्यांना दीर्घायुष्य इच्छितो.

आदिवासी समाज कृती समितीतर्फे आदिवासी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे.

गौरव विशेषांकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

(प्रा. वसंत पुरके)

# आदिवासी भूषण पुरस्कार



मा. श्री. पांडुरंगबाबा गांगड

# आदिवासी भूषण पुरस्कार

## ॥ सन्मानपत्र ॥

### मा. श्री. पांडुरंगबाबा गांगड

नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी तालुक्यातील उभाडेवाडी (घोटी) येथे गरीब आदिवासी कुटुंबात १ जून १९५२ रोजी आपण जन्माला आलात. १ली ते ७वी पर्यंतचे शिक्षण इगतपुरी आणि पुढील शिक्षण नाशिक येथे पूर्ण केले. आई-वडील, बहीण व स्वतः आपण अशा चार माणसांच्या उदरनिर्वाहाची सतत चिंता असतानाही अशा हलाखीच्या स्थितीत आपण आपले ध्येय सोडले नाही. पुढे १९७२-७३ या दुष्काळाने ग्रासलेल्या वर्षात आपण आय.टी.आय. हा कोर्स पूर्णकरून स्वतःच्या हिमतीवर बी.सी.एल.एफ.लि. या कंपनीत नोकरी मिळवत गरिबीवर मात केली.

कष्टाळू आणि मेहनती आई-वडिलांनी आपल्यावर जे संस्कार केले, त्याचे खऱ्या अर्थाने चीज झाले. समाजसेवेचे धडे आपल्याला प्रथम घरातून व नंतर शिक्षणातून मिळत गेले. त्या वेळी धर्माच्या नावाखाली बहुजन वर्गाला वेठीस धरले जात होते. पुत्रप्राप्तीसाठी देवदेवतांची पूजाअर्चा करणे, नवस, व्रतवैकल्य हे सर्व थांबविण्यासाठी आपण मोठ्या चातुर्याने संघटना उभी करून शिक्षणाचा प्रसार केला.

सामाजिक कार्यात मग्न असताना पुढे विधानसभेच्या निवडणुका आल्या आणि जनतेच्या आग्रहास्तव आपण निवडणूक लढविली. त्यात अपयश आले, पण आपण हार न मानता जिद्द सोडली नाही. जनसंपर्क दांडगा ठेवल्याने दुसऱ्या निवडणुकीत बाजी मारून तब्बल ३४ हजार मतांनी विजयी झालात. विरोधी पक्षात असताना विविध पक्षांच्या पुढाऱ्यांनी टीकेची झोड उठविली. आपण मात्र लीलया परतवत सडेतोड उत्तर दिले. आपल्या गावपातळीवरील विकास कामांकडे कोणाचेही लक्ष नसताना आपण तिकडेच मोर्चा वळवत विकासकामांच्या रूपाने अब्जावधी रुपयांची कामे जनताजनार्दनांना सुपूर्त केली. त्यांतून आदिवासी बांधवांच्या शेवटच्या माणसाच्या हाताला काम मिळाले.

आपण पाच वर्षांच्या काळात आमदार निधीतून विकास कामे करण्याचा जो सपाटा लावला त्याला तोडच नाही. प्रथम कळमुस्ते ते हर्षवाडी हा ५० वर्षे दुर्लक्षित असलेला अतिदुर्गम भाग व त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे काम पूर्ण केले. घोटीजवळील कपिलधारातीर्थ विकासासाठी आपण जी विशेष मेहनत घेऊन तब्बल चार कोटी रुपयांचा निधी मिळवून दिल्याने आपल्या कार्यकर्तृत्वाची ही खास बाब समजली जाते. आमदारकीच्या हयातीत जी छोटी-मोठी कामे केली, त्यांची नुसती यादी जरी वाचली तरी विरोधकांचे डोळे पांढरे झाल्याशिवाय राहत नाहीत. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, घोटी-शिर्डी हायवे द्रुतगती मार्गावर रेल्वे उड्डाणपूल बांधून आदिवासींच्या जमिनी वाचवल्याने आपल्याकडे एक दूरदृष्टीचा नेता म्हणून पाहिले जाते.

आदिवासी बांधवांनी जी संधी उपलब्ध करून दिली, तिच्या मोबदल्यात आपण पायाला चाके बांधल्यागत फिरून सर्व आदिवासी भाग पिंजून काढला. आमदार म्हणजे नेता नव्हे, तो समाजाचा सेवक असतो. हे समीकरण अमलात आणून समाजाची खऱ्या अर्थाने सेवा केली व करत आहात. आपल्या या तळमळीची व कार्याची नोंद पुढे होईलच. मात्र कर्तव्यभावनेने आदिवासी कृती समिती आपल्याला 'आदिवासी भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करीत आहे. आपण त्याचा स्वीकार करावा, ही विनंती.

| श्री. सीताराम जोशी | प्रा. एकनाथ बुरसे | श्री. सुदाम मराडे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

# आदिवासी समाज कृती समितीने दिलेले
# आदिवासी भूषण पुरस्कार

१ला आदिवासी भूषण पुरस्कार - १९९९



कै. डॉ. गोविंद गारे

२रा आदिवासी भूषण पुरस्कार - २०००




कॉम्रेड नजुबाई गावीत

३रा आदिवासी भूषण पुरस्कार - २००१



श्री. काळूराम दोधडे

४था आदिवासी भूषण पुरस्कार - २००२



मा. श्री. मधुकरराव पिचड, माजी मंत्री-आदिवासीविकास

*हार्दिक शुभेच्छा!*

# पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे

५३/१ब, विनायकनगर, गणपती चौक, नवी सांगवी, पुणे-४११०२७

☎: २७२८५१६३

**संपूर्ण संगणकीकृत**

• कामकाज वेळ •

सोमवार ते शुक्रवार : दुपारी ४ ते सायं. ८

शनिवार व रविवार : स. ११ ते दु. ४

• आमची मुख्य उद्दिष्टे •

• ठेवी वाढविणे • सभासद वाढविणे • जास्तीतजास्त सभासदांना कर्ज वितरण करणे •
•जास्तीतजास्त सभासदांना सहभागी करून घेण्यासाठी विभागवार एक दिवस संस्थेचे कामकाज चालविणे•

• आकर्षक ठेव योजना - मुदत ठेव •

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ९० दिवस | ६.५% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५% |
| ९१ ते १८० दिवस | ७.५% |
| १ वर्ष ते २ वर्षे | १०.०% |
| २ वर्षापेक्षा जास्त | ११.०% |

• संचालक मंडळातर्फे •

सौ. रंजना मोरमारे — अध्यक्षा
श्री. निवृत्ती उतळे — उपाध्यक्ष
श्री. दुंदा मोरे — मानद सचिव

• संचालक सदस्य •

श्री. विजय डगळे
श्री. राजेंद्र पोटकुले
डॉ. पोपट जोशी
श्री. राजेंद्र रेंगडे
श्री. केशव चिमटे
श्री. मधुकर कोकणे
श्री. शांताराम मोईर
श्री. मुकुंद मोरमारे
श्री. योगेश साबळे
सौ. आशा दाते (महिला संचालक)